# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक क्र. ३१५/ २०२४

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना आणि सामुहिक वैयक्तिक अपघात योजना व त्यांच्या नातेवाईकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना दि. ११ नोव्हेंबर, २००४ पासून राबविण्यात येत आहे. सदर पॉलिसी ही Floater Policy या प्रकारची आहे. सेवक व सेवकांचे नातेवाईक मिळून विम्याची सध्याची कमाल मर्यादा दि. ११/११/२०१५ पासून रुपये ३ लाख करण्यात आलेली आहे तसेच दि. ११/११/२०१८ पासून नातेवाईकांची संख्या ३ वरून ५ वाढविण्यात आलेली आहे. **या वर्षी करण्यात आलेल्या नूतनीकरणामध्ये रुमची मर्यादा(नर्सींग चार्जेस सह) रु.२०००/- वरुन रु.३०००/- करण्यात आलेली आहे.**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार २१ व्या वर्षी (दि. ११/११/२०२४ ते १०/११/२०२५) विमा पॉलिसीचे एस.बी.आय. जनरल इन्श्युरन्स कं.लि. यांच्याकडे नूतनीकरण करण्यात आलेले असून पॉलिसीच्या क्लेमबाबतचे कामकाज ही कंपनी स्वतः करणार आहे.

सेवकांचा विमा हप्ता म्हणून १००% रक्कम व सेवकांच्या नातेवाईकांची विमा हप्त्याची ५०% रक्कम विद्यापीठ निधीतून अदा करण्यात आली असून ५०% रक्कम सेवकाच्या माहे डिसेंबर, २०२४ ते फेब्रुवारी, २०२५ च्या वेतनातून कपात करण्यात येणार आहे. ती खालीलप्रमाणे -

| विद्यापीठ निधीतून अदा केलेली रक्कम रू. | | | सेवकांच्या वेतनातून नातेवाईकांची वसूल करावयाची ५०% रक्कम रू. | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सेवक रु. | नातेवाईक रु. | एकूण रक्कम रु. | माहे डिसेंबर २०२४ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे जानेवारी २०२५ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे फेब्रुवारी २०२५ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | एकूण कपात होणारी रक्कम रु. |
| २०,२९६/- | ३००९/- एक नातेवाईक | २३,३०५/- | ५०२/- | ५०२/- | ५०१/- | १,५०५/- |
| २०,२९६/- | ६०१८/- दोन नातेवाईक | २६,३१४/- | १,००३/- | १,००३/- | १,००३/- | ३,००९/- |
| २०,२९६/- | ९०२७/- तीन नातेवाईक | २९,३२३/- | १,५०५/- | १,५०५/- | १,५०४/- | ४,५१४/- |
| २०,२९६/- | १२०३६/- चार नातेवाईक | ३२,३३२/- | २,००६/- | २,००६/- | २,००६/- | ६,०१८/- |
| २०,२९६/- | १५०४५/- पाच नातेवाईक | ३५,३४१/- | २,५०८/- | २,५०७/- | २,५०७/- | ७,५२२/- |

**विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वैद्यकीय विमा योजनेविषयीची माहिती पुढील लिंकवर ठेवण्यात आलेली आहे. Home Page > Circulars > Mediclaim Policy**

एस.बी.आय. जनरल इन्श्युरन्स कं.लि. क्लेमबाबत विमा कंपनी प्रतिनिधी म्हणून श्री. अयाझ शेख, मो.(७०२१५५६७१८) व विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून श्रीमती शितल उगले, मो.(९५४५२२६७७९) यांच्याशी संपर्क करण्यात यावा. या कंपनीची वेबसाईट health.sbigeneral.in ही असून ,या संकेतस्थळावर आपण लॉगइन करताना स्वत:चा सेवक क्र.घेऊन लॉगइन करावे. उदा. सेवक क्र.२०००@SPPU.IN, पासवर्ड २००० घ्यावा व तो लगेच बदलून अद्ययावत करावा. लॉगइन केल्यानंतर आपणांस विमा कार्ड, खर्च परतावा अर्ज, खर्च परतावा ऑनलाईन भरण्याची सुविधा, क्लेम स्टेटस् इ.दी.माहिती मिळते. आपले विमा कार्ड आपल्या एच.आर.मध्ये सद्धा अद्ययावत करण्यात आलेले आहेत.

सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सेवकांच्या नातेवाईकांचा विमा हप्ता कपात करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२४-२५/६९५
दिनांक : २७ डिसेंबर, २०२४

**(सीएमए (डॉ.) चारुशीला गायके)**
वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग,
२. मा. संचालक, सर्व प्रशाला.
३. मा.शाखाप्रमुख,सर्व प्रशासकीय शाखा,

सदर परिपत्रकामधील आशय आपल्या विभागामधील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.